मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांमध्ये शेरोशायरीतून जुगलबंदी

## मोशीतील सभेत अजित पवारांचा पलटवार; शेरोशायरीतूनच राजकीय टोलेबाजी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात शेरोशायरीतून जुगलबंदी रंगली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी शायरीतून अजित पवार यांना टोला लगावला होता. त्याला अजित पवार यांनी रविवारी शायरीतूनच प्रत्युत्तर दिले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या मोशीतील उमेदवारांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सभा रविवारी झाली.

अजित पवार म्हणाले, काही मोठे लोक शहरात येऊन गेले. शेरोशायरी करून गेले. मलाही जरा खुमखुमी आली आहे. 'हर पंख फैलाने वाला परींदा उड नही पाता, कही सपने घमंड और गलत दिशा मे ही टूट जाते है, हुनर की बाते करने से, कुछ नही होता, जमाना उशीको पहचानता है, जो मैदान मे उतरके साबिद करे' असा शेर अजित पवार यांनी मारला. हे सिद्ध करण्यासाठी आम्ही मैदानात उतरलो आहे. जनतेने साद द्यावी, असे आवाहन अजित पवार यांनी केले.



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय म्हणाले होते!**

परिंदे को मिलेगी मंजिल एकदिन, ये उनके फैले हुये पंख बोलते है! और वही लोग जो खामोश रहते है, अक्सर जमाने मे जिनके हुनर बोलते है !!

आपले काम बोलत आहे. त्यामुळे हा वैताग आहे, हा त्रागा आहे, हा राग राग आहे. जरा समजून घ्या आमदार महेशदादा, ते रागावले म्हणून तुम्ही रागावू नका. त्यांना सांगायला काम नाही. त्यांना अनेक प्रश्न विचारले जातात, त्यांच्याकडे उत्तरे नाहीत. त्यामुळे त्यांना आरोप-प्रत्यारोपात ही निवडणूक गुंतवून ठेवायची आहे. पण, आपण विकासाच्या मुद्यावर बोलत रहायला हवे. म्हणजे, आरोप-प्रत्यारोप करत बसण्याची वेळ येणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले होते.

### कारभारी प्रत्येक कामात कमिशन काढतो

» अजित पवार म्हणाले, महापालिकेतील कारभारी प्रत्येक कामात कमिशन काढत आहेत. प्रत्येक कामात पाच आणि सात टक्के कमिशन घेतले जात आहे. त्यातून त्यांच्या एवढ्या मालमत्ता झाल्या आहेत. पदे देऊनही पक्षांतर केले. हे स्वार्थी लोक आहेत. उगवत्या सूर्याला नमस्कार करतात. सरड्यासारखे रंग बदलत आहेत. बघतो, करतो अशा धमक्या दिल्या जात आहेत. या धमक्यांना कोणीही घाबरू नये. २५ वर्षे शहराचा विकास करण्यासाठी बारामतीला जावे लागले नाही. भावनिक मुद्दे काढले जात आहेत. माझी कर्मभूमी पिंपरी-चिंचवड शहर आहे. मी गल्लीतील दादा नाही. महाराष्ट्राचा दादा आहे. मी राज्याचे नेतृत्व करतो.

---

# मतदान जनजागृतीसाठी महापालिकेकडून व्हिंटेज कार रॅलीचे आयोजन

## निवडणुकीसाठीचे सर्वात महत्वाचे कर्तव्य म्हणजे मतदान : निवडणूक निरीक्षक सरिता नरके

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकशाही प्रक्रिया बळकट करण्यासाठी प्रत्येक सुजाण नागरिकाने मतदान करणे आवश्यक आहे, १५ जानेवारी रोजी राज्य शासनाने निवडणुकीसाठी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. त्या दिवशी सर्वप्रथम शहरातील सर्व मतदारांनी आपापल्या मतदान केंद्रावर जाऊन मतदान करावे, आपले मतदान ही आपली जबाबदारी असून आपल्या कर्तव्याचा हा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे असे प्रतिपादन निवडणूक निरीक्षक सरिता नरके यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मतदान जनजागृतीसाठी आयोजित व्हिंटेज कार रॅली लिनिअर गार्डन (कोकण चौक), पिंपळे सौदागर ते नियोजित महापौर निवास मैदान, निगडी येथे पार पडली. या रॅलीचे उद्घाटन निवडणूक निरीक्षक सरिता नरके यांच्या हस्ते झेंडा दाखवून करण्यात आले त्यावेळी त्या मार्गदर्शन करताना बोलत होत्या.

यावेळी महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, मतदार जनजागृतीसाठीच्या ब्रँड ॲम्बेसिडर प्रसिद्ध अभिनेत्री श्रेया बुगडे, उप आयुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता हरविंदर सिंग बन्सल, जनता संपर्क अधिकारी



प्रफुल्ल पुराणिक तसेच क्लासिक कार क्लबचे अध्यक्ष अनंत भुकेले पाटील उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर म्हणाल्या की, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली मतदानाचा टक्का वाढावा व जास्तीत जास्त मतदान व्हावे यासाठी 'स्वीप' उपक्रमांतर्गत उप आयुक्त अण्णा बोदडे व त्यांची संपूर्ण टीम कार्यरत आहे. मतदार जनजागृतीसाठी महापालिकेकडून विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. जागरूक मतदारांनी कोणत्याही दबावाला किंवा प्रलोभनाला बळी न पडता मोठ्या संख्येने मतदानासाठी बाहेर पडावे आणि लोकशाही प्रक्रियेत सहभागी होऊन लोकशाही बळकट करावी.

पिंपरी चिंचवडमधील नागरिक अत्यंत जागरूक व सुज्ञ असून त्यांना त्यांच्या हक्क व कर्तव्यांची पूर्णतः जाणीव आहे. त्यामुळे १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत नागरिक मोठ्या संख्येने आपल्या मतदान केंद्रावर जाऊन मतदान करतील, असा विश्वास मतदार जनजागृतीसाठीच्या ब्रँड ॲंबेसेडर व प्रसिद्ध अभिनेत्री श्रेया बुगडे यांनी व्यक्त केला.

**अनोख्या व्हिंटेज कार्स व दुचाकी**

१९३५ पासूनच्या विविध प्रकारच्या आकर्षक गाड्यांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. यामध्ये फोर्ड,१९५० ते २००० मधील मिली सिटॉप, मर्सिडिज,प्रिमियर पद्मिनी,११८ एन.ई.,सिलेक्ट, प्रेसिडेंट तसेच दुसऱ्या महायुद्धातील जीप तसेच लंब्रेटा,विजया सुपर, राजदूत, येझदी,व्हेस्पा,बजाज सुपर अशा दुचाकींसह आदी गाड्यांचाही समावेश होता. फियाट क्लासिक कार क्लबचे अध्यक्ष अनंत भुकेले पाटील यांनी यावेळी उपस्थितांना विविध गाड्यांची सविस्तर माहिती दिली.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे पिंपरी-चिंचवड हमीपत्र जाहीर!

## मेट्रो-पीएमपीएमएल मोफत प्रवास, 500 चौ.फुट घरांना करमाफी, विद्यार्थ्यांना टॅबलेट

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसने नागरिकांसाठी महत्त्वाकांक्षी हमीपत्र जाहीर केले आहे. मेट्रो व पीएमपीएमएल बस प्रवास मोफत, विद्यार्थ्यांना डेटा प्लॅनसह मोफत टॅबलेट, ५०० चौ.फुटांपर्यंतच्या घरांना मालमत्ताकर माफी, रोज नळाद्वारे पाणीपुरवठा व टँकरमुक्त शहर, वादग्रस्त सुधारित विकास आराखडा (डीपी) रद्द करणे, लाडक्या बहिणींना ५ लाख रुपयांचे बिनव्याजी कर्ज आदी प्रमुख आश्वासने या हमीपत्रात देण्यात आली आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पिंपरी-चिंचवड शहराध्यक्षांच्या वतीने 'संकल्प सात, पुन्हा सुरुवात' या नावाने प्रसिद्ध करण्यात आलेल्या या हमीपत्राचे प्रकाशन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी आमदार विलास लांडे पाटील, शहराध्यक्ष योगेश बहल, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे आदी उपस्थित होते.




अजित पवार यांनी सांगितले की, "हे हमीपत्र पिंपरी-चिंचवडकरांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आले आहे. सत्ता मिळताच या सर्व आश्वासनांची अंमलबजावणी केली जाईल."

**प्रमुख हमी व योजना**

**रोज नळाद्वारे पाणी, टँकरमुक्त शहर :**

सर्व प्रभागांत उच्च दाबाने दररोज नळाद्वारे पाणीपुरवठा केला जाईल. पाणीपुरवठ्याचे निश्चित वेळापत्रक तीन महिने आधी जाहीर करण्यात येईल. टँकरमाफियांचे १०० टक्के उच्चाटन करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला असून प्रत्येक प्रभागात सामुदायिक विहिरी व दीर्घकालीन जलव्यवस्थापन आराखडा राबविण्यात येणार आहे. जलवाहिन्यांच्या दुरुस्तीसाठी मोबाईल सेन्सर व्हॅन्स तैनात केल्या जातील.

**पवना, भामा आसखेड प्रकल्प**

पवना प्रकल्पाची रखडलेली पाईपलाईन व भामा आसखेड प्रकल्पातील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण केली जातील.

**मेट्रो व पीएमपीएमएल मोफत**

सर्व नागरिकांसाठी मेट्रो व पीएमपीएमएल बस प्रवास मोफत करण्यात येणार आहे. लास्ट माईल कनेक्टिव्हिटीसाठी फिडर बस सेवाही उपलब्ध होणार आहे.

**मालमत्ताकर माफी :**

१ एप्रिल २०२६ पासून ५०० चौ.फुटांपर्यंतच्या घरांचा मालमत्ताकर माफ केला जाणार आहे. याचा थेट लाभ मध्यमवर्गीय, ज्येष्ठ नागरिक व लहान घरमालकांना मिळणार आहे.

**विद्यार्थ्यांना मोफत टॅबलेट :**

डेटा प्लॅनसह मोफत टॅबलेट देऊन डिजिटल शिक्षणाला चालना दिली जाणार आहे.

**लाडक्या बहिणींना बिनव्याजी कर्ज :**

कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना स्वयंरोजगारासाठी किंवा उद्योग विस्तारासाठी ५ लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज देण्यात येणार आहे.

**शहरी गरीब आरोग्य योजना :**

पुणे महापालिकेच्या धर्तीवर पिंपरी-चिंचवडमध्ये शहरी गरीब आरोग्य योजना सुरू करण्यात येणार आहे. सामान्य आजारांसाठी २ लाख व गंभीर आजारांसाठी ५ लाख रुपयांपर्यंत उपचार सहाय्य दिले जाणार आहे. बर्न वॉर्ड, कर्करोग रुग्णालय, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, मेडिकल कॉलेज, टेलिमेडिसिन, स्वस्त दरात MRI व CT स्कॅन आदी सुविधा देण्याचे आश्वासन आहे.

**१०० मॉडेल शाळा :**

महापालिकेच्या १०० शाळांचे मॉडेल स्कूलमध्ये रूपांतर, सीबीएसई व आयसीएसई मानांकनाच्या नवीन शाळा, आधुनिक प्रयोगशाळा, क्रीडा सुविधा व कोणतेही अतिरिक्त शुल्क नसलेले शिक्षण देण्यात येणार आहे.

**डिपी रद्द, मालमत्तांचे संरक्षण :**

वादग्रस्त सुधारित विकास आराखडा रद्द करण्यात येणार असून कायदेशीर मालमत्तांचे पूर्ण संरक्षण दिले जाईल. गुंठेवारी नियमितीकरण प्रक्रिया ऑनलाइन व पारदर्शक करण्यात येणार आहे.

**झोपडपट्टी पुनर्वसन :**

विस्थापनाऐवजी पुनर्वसनावर भर देत स्वतंत्र एसआरए कक्ष स्थापन केला जाईल. तीन वर्षांत प्रकल्प पूर्ण न झाल्यास वाढीव भाडे देण्याची तरतूद असेल.

**नवीन कनेक्टिव्हिटी व मेट्रो लाईन :**

निगडी-रावेत-वाकड टेक कॉरिडॉर, मोशी-चिखली-तळवडे ग्रोथ कॉरिडॉर, औद्योगिक लूप, उड्डाणपूल, अंडरपास व वाकड-पिंपळे सौदागर-भोसरी-चाकण नवीन मेट्रो लाईन सुरू करण्याचा समावेश आहे.

**कला व क्रीडा :**

कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रासाठी स्वतंत्र कृती आराखडा सात दिवसांत सादर केला जाणार आहे. या सात हमींच्या माध्यमातून पिंपरी-चिंचवडचा सर्वांगीण विकास साधण्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेसने केला आहे.

# निखिल बोऱ्हाडे यांच्या विजयाचा गुलाल निश्चित

## प्रभाग क्रमांक 2 मध्ये नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

प्रभाग क्रमांक २ मध्ये निवडणुकीचे वारे वेगाने वाहू लागले असून, निखिल बोऱ्हाडे यांच्या प्रचार मोहिमेने आता विजयाच्या दिशेने कूच केली आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या त्यांच्या पदयात्रा आणि कोपरा सभांना मतदारांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळत असून, त्यांच्या विजयाची खात्री आता कार्यकर्त्यांसह सामान्यांमध्येही दिसून येत आहे. नुकत्याच झालेल्या प्रचार फेरीत निखिल बोऱ्हाडे यांचे ठिकठिकाणी मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. फुलांच्या पाकळ्यांची उधळण, ढोल-ताशांचा गजर करत आणि महिलांनी केलेले औक्षण यामुळे संपूर्ण प्रभाग 'निखिल बोऱ्हाडे यांना अभूतपूर्व प्रतिसाद पाहायला मिळाला.



या प्रचार दौऱ्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची असलेली उपस्थिती लक्षणीय होती. बोऱ्हाडे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून प्रभागात केलेले सामाजिक काम आणि नागरिकांच्या अडीअडचणीला धावून जाण्याची त्यांची वृत्ती आज त्यांच्या प्रचारात फलद्रुप होताना दिसत आहे. 'आमच्या हक्काचा माणूस' अशा भावना यावेळी अनेक ज्येष्ठांनी व्यक्त केल्या.

महिला सक्षमीकरणासाठी त्यांनी दिलेलं योगदान ही त्यांच्या एकूण कार्याची सगळ्यात जमेची बाजू मांडली जात आहे. आज बचत गटाच्या माध्यमातून त्यांनी स्वावलंबी महिलांची मोठी फळी उभी केली आहे. आर्थिक दृष्ट्या सक्षम झालेल्या महिलांमध्ये आत्मविश्वासही वाढला आहे.

केवळ निवडणुकीपुरते मर्यादित न राहता, त्यांनी प्रभागातील नागरी समस्या, आरोग्य आणि शिक्षणासाठी केलेले कार्य मतदारांच्या मनावर ठसलेले आहे. रस्ते, पाणी आणि स्वच्छतेच्या प्रश्नांवर त्यांनी दिलेल्या लढ्यामुळेच आज जनमत त्यांच्या बाजूने झुकताना दिसत असून, मतदारांच्या या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे निखिल बोऱ्हाडे यांची विजयाकडे वाटचाल निश्चित मानली जात आहे.

# एकाच वेळी 700 सराइतांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परिमंडळ दोनच्या हद्दीतील ७०६ सराइतांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे आदेश पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांनी शनिवारी दिले.

पुणे पोलिसांच्या परिमंडळ दोनमध्ये स्वारगेट, सहकारनगर, पर्वती, बिबवेवाडी, मार्केट यार्ड, आंबेगाव, भारती विद्यापीठ या पोलीस ठाण्यांच्या समावेश होतो.'महापालिका निवडणुकीत कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, तसेच सराइतांना जरब बसविण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ (२) अतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. खून, खुनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत, मारहाण, शिवीगाळ करणे, दहशत माजविणे अशा स्वरुपाचे गंभीर गुन्हे दाखल असलेल्या सराइतांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. निवडणूक पार पडेपर्यंत सराइतांना परिमंडळ दोनच्या हद्दीत येण्यास मनाई करण्यात आली आहे', असे पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांनी सांगितले.




### सराइतांचा मतदानाचा हक्क

» कारवाई करण्यात आलेल्या सराइतांचा मतदानाचा हक्क अबाधित ठेवण्यात आला आहे. मात्र, परिमंडळ दोनच्या हद्दीतील सार्वजनिक कार्यक्रमात वावरणे, कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, अशा प्रकारचे वर्तन करण्यास मनाई करण्यात आली आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

कारवाई करण्यात आलेल्या सराइतांचा मतदानाचा हक्क अबाधित ठेवण्यात आला आहे. मात्र, परिमंडळ दोनच्या हद्दीतील सार्वजनिक कार्यक्रमात वावरणे, कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, अशा प्रकारचे वर्तन करण्यास मनाई करण्यात आली आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

मतदारांना प्रलोभन दाखविणे कायद्याने गुन्हा आहे. असे प्रकार आढळल्यास त्वरीत पोलिसांना माहिती द्यावी, तसेच मतदारांवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबाव टाकल्यास गुन्हा दाखल करण्याचा इशारा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे. कोथरूड भागातील गुंड गजानन मारणे याने मतदारांना दूरध्वनी केल्याचे उघडकीस आल्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला समज दिली होती. असे प्रकार आढळून आल्यास गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

पुणे पोलिसांच्या परिमंडळ दोनमध्ये स्वारगेट, सहकारनगर, पर्वती, बिबवेवाडी, मार्केट यार्ड, आंबेगाव, भारती विद्यापीठ या पोलीस ठाण्यांच्या समावेश होतो. पुणे पोलिसांच्या परिमंडळ दोनमध्ये स्वारगेट, सहकारनगर, पर्वती, बिबवेवाडी, मार्केट यार्ड, आंबेगाव, भारती विद्यापीठ या पोलीस ठाण्यांच्या समावेश होतो.'महापालिका निवडणुकीत कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, तसेच सराइतांना जरब बसविण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ (२) अतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली

### मतदारांना प्रलोभन दाखविणे कायद्याने गुन्हा

» मतदारांना प्रलोभन दाखविणे कायद्याने गुन्हा आहे. असे प्रकार आढळल्यास त्वरीत पोलिसांना माहिती द्यावी, तसेच मतदारांवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबाव टाकल्यास गुन्हा दाखल करण्याचा इशारा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे. कोथरूड भागातील गुंड गजानन मारणे याने मतदारांना दूरध्वनी केल्याचे उघडकीस आल्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला समज दिली होती. असे प्रकार आढळून आल्यास गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.


> परिमंडळ दोनधील सात पोलीस ठाण्यांच्या हद्दीत वास्तव्य करणाऱ्या ७०६ सराइतांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. त्यांना त्वरीत परिमंडळ दोनची हद्द सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महापालिका निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी ही कारवाई करण्यात आली आहे.
> - मिलिंद मोहिते, पोलीस उपायुक्त, परिमंडळ दोन

# 'इनोव्हेट यू टेकॅथॉन 3.0 – 2026' : राष्ट्रीय स्तरावरील हॅकेथॉनचे आयोजन

## महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी नावीन्यपूर्ण संकल्पनांना वाव; 21-22 फेब्रुवारीला पुण्यात स्पर्धा, नोंदणी सुरू

**पुणे | प्रतिनिधी**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील नावीन्यपूर्ण संकल्पनांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्यातील उद्यमशीलतेला पाठबळ देण्याच्या उद्देशाने इनोव्हेशन फाउंडेशनच्या वतीने 'इनोव्हेट यू टेकॅथॉन 3.0 2026' या राष्ट्रीय स्तरावरील हॅकेथॉनचे आयोजन 21 आणि 22 फेब्रुवारी 2026 रोजी करण्यात आले असून, या हॅकेथॉनमध्ये सहभागी होण्यासाठीची ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे, अशी माहिती इनोव्हेशन फाउंडेशनचे अध्यक्ष कल्पेश यादव यांनी दिली.



ही स्पर्धा ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीच्या एआयएसएसएमएस इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (आयओआयटी) महाविद्यालयात होणार आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून सामाजिक समस्यांवर तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उपाय शोधून त्याचे उपाय समाजासमोर आणण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. इनोव्हेशन फाउंडेशनच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत यादव बोलत होते. यंदा हॅकेथॉनचे तिसरे वर्ष असून, दरवर्षी स्पर्धा अधिक मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्यात येत आहे. गेल्या वर्षी हॅकेथॉनमध्ये देशातील नामांकित इंजिनीअरिंग कॉलेजसह विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या 400 पेक्षा अधिक महाविद्यालयांच्या संघाने सहभाग घेतला होता.

हॅकेथॉनचे मधील विजेत्यांसाठी गटनिहाय लाखो रुपयांची रोख पारितोषिके प्रदान करण्यात येणार असून, सर्वाधिक नावीन्यपूर्ण आणि समाजोपयोगी प्रकल्पासाठी इनोव्हेशन अवॉर्ड देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे एआय तंत्रज्ञानाचा प्रभावी व कल्पक वापर करणाऱ्या प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन दिले जाणार आहे, असे यादव यांनी सांगितले. यादव म्हणाले, या उपक्रमाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, तंत्रशिक्षण संचलनालय, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, आयडीटीआर, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे; तसेच सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठ यांचा पाठिंबा लाभला आहे.

### गटनिहाय हॅकेथॉन आणि पारितोषिके

» हॅकेथॉनसाठी एड्युटेक, पर्यावरण, आरोग्यसेवा, ट्रॅफिक मॅनेजमेंट, आपत्ती व्यवस्थापन आणि ॲग्राटिक अशा विषयांवरील समस्या देण्यात येणार असून, विद्यार्थ्यांना दिलेल्या वेळेत तंत्रज्ञानावर आधारित उपाय विकसित करावे लागणार आहेत. इंजिनीअरिंग, पॉलिटेक्निक, बीसीए, एमसीए, बी-टेक ॲग्री आदी अभ्यासक्रमांचे विद्यार्थी 3 ते 4 जणांच्या गटाने या हॅकेथॉनमध्ये सहभागी होऊ शकतात. गटातील प्रत्येक विजेत्याला पारितोषिकाने गौरविण्यात येणार आहे, असे कल्पेश यादव यांनी सांगितले.

# मोक्का-एमपीडीए कारवाईचा धडाका; पुणे ग्रामीण गुन्हेगारीला लगाम

## खून, घरफोडी, चोरीत मोठी घट; पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांच्या रणनीतीचा परिणाम

**पुणे | प्रतिनिधी**

मोक्का ( महाराष्ट्र संघटित गुन्हेगारीविरोधी कायदा), तडीपारी आणि एमपीडीए (स्थानबद्धता) या त्रिसूत्री कारवाईमुळे पुणे जिल्हा पोलिसांनी जिल्ह्यातील गुन्हेगारीचे कंबरडे मोडले असल्याचे दिसून येते. ग्रामीण परिसरातील गंभीर गुन्ह्यांच्या घटनेमध्ये मोठ्या प्रमाणावर घट झाली आहे. 2024 मध्ये 90 खुनाच्या घटना घडल्या होत्या, तर 2025 मध्ये घट होऊन हा आकडा 82 वर आला आहे. जबरी चोरींच्या घटनामध्ये मात्र वाढ झाल्याचे दिसते.

ग्रामीण पोलिसांसमोर आज अनेक आव्हाने उभी आहेत. झपाट्याने वाढणारे शहरीकरण, ग्रामीण भागात शिरकाव करणारी संघटित गुन्हेगारी, आंतरजिल्हा व आंतरराज्य टोळ्यांची हालचाल, अमलीपदार्थांची तस्करी तसेच मर्यादित मनुष्यबळ आणि विस्तीर्ण भौगोलिक कार्यक्षेत्र ही मोठी अडचण आहे. याशिवाय तांत्रिक गुन्हे, सोशल मीडियाचा गैरवापर आणि नागरिकांच्या वाढत्या अपेक्षाही पोलिसांसाठी कसोटी ठरत आहेत. या आव्हानांवर ग्रामीण पोलिसांनी प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई, गुन्हेगारांची हिस्ट्रीशीट तपासणी, रात्रीचे गस्त पथक, गुप्त माहितीवर आधारित धडक कारवाया आणि नागरिकांशी समन्वय साधत मात केली आहे. कायद्याचा धाक, तंत्रज्ञानाचा वापर आणि तत्पर तपासामुळे गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यात पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांच्या मार्गदर्शनात ग्रामीण पोलीस यशस्वी ठरत आहेत.

ग्रामीण पोलिसांकडून जबरी चोरीच्या घटना एकीकडे 172 वरून 215 झालेल्या असताना दुसरीकडे पोलिसांच्या नियोजनबद्ध योजनेमुळे घरफोडीच्या संख्या 629 वरून 466 वर आली आहे. दुचाकीचोरीच्या घटनांध्ये 987 वरून या घटना 802 वर आला आहे, तर इतर चोरीच्या घटना 2024 मध्ये 1 हजार 171 होत्या, तर याच घटनांमध्ये 1 हजार 27 वर आल्या आहेत.



### अनोळखी मृतदेहावरून खुनाच्या 9 घटनांचा छडा

» जिल्ह्यातील विविध भागांत आढळून आलेल्या 9 अनोळखी मृतदेहाची ओळख पटवून कौशल्यपूर्वक तपास करून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांनी खुनाचा छडा लावला आहे. अशा गुन्ह्यांचा तपास करून पोलिसांनी आरोपींना गजाआड केले आहे. 2025 या वर्षात जिल्ह्यात 88 खुनाचे गुन्हे घडले असून, त्यातील 82 गुन्ह्यांचा छडा एकट्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांनी वरिष्ठ पोलिस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांच्या मार्गदर्शनाखाली लावला आहे.

### गिल्ल यांनी काय बदलले

- » संघटित गुन्हेगारी टोळ्यांवर कठोर कारवाई करून गुन्हेगारीचे कंबरडे मोडले
- » आंतरजिल्हा व आंतरराज्य टोळ्यांचा पर्दाफाश करून आरोपींना अटक
- » मोक्का, एमपीडीए, हद्दपारीसारख्या कायद्यांचा प्रभावी वापर
- » मालमत्तेविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुन्हे उघडकीस
- » चोरी, घरफोडी, दरोडे प्रकरणांत मुद्देमाल जप्त करून रिकव्हरी वाढवली
- » अमलीपदार्थांची तस्करी उधळून लावून कोट्यवधींचा साठा जप्त
- » अवैध शस्त्रसाठ्यावर कारवाई करून गुन्हेगारांचे नेटवर्क तोडले
- » गंभीर गुन्ह्यांचा तपास जलदगतीने पूर्ण करून दोषारोपपत्र दाखल
- » प्रतिबंधात्मक कारवाईतून संभाव्य गुन्हे आधीच रोखले

> गुन्हेगारांच्या बंदोबस्तासाठी प्रतिबंधात्मक कारवाईवर भर, सतत गुन्हे घडणाऱ्या परिसराचे विश्लेषण करून सूत्रबद्ध योजना तयार केली. त्याचबरोबर लोकाभिमुख पोलिसिंगवर भर दिला. दरोडा, चोऱ्या रोखण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेच्या एका विशेष पथकाची स्थापना करून सराईत गुन्हेगारांची यादी तयार करून त्यांच्यावर नियंत्रण ठेवले. त्यामुळे मागील वर्षीच्या तुलनेत 2025 वर्षातील गंभीर गुन्ह्यांच्या घटनाबरोबरच घरफोडी, चोरीच्या घटना कमी करण्यात पुणे ग्रामीण पोलिसांना यश आले आहे.
>
> \- संदीपसिंह गिल्ल, पोलिस अधीक्षक, पुणे ग्रामीण

# तळेगाव गटात लवकरच राजकीय भूकंप? निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच इच्छुकांची मोर्चेबांधणी सुरू

## जिल्हा परिषद निवडणुकीचा बिगुल वाजण्यापूर्वीच तळेगाव ढमढेरेत 'गुप्त' खलबतं

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील राजकारणाचा कणा मानल्या जाणाऱ्या तळेगाव ढमढेरे जिल्हा परिषद गटात सध्या राजकीय हालचालींना उधाण आले असून निवडणुकीपूर्वीच मोठ्या राजकीय भूकंपाची चाहूल लागली आहे. या आठवड्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता असल्याने पडद्यामागील राजकारण, गुप्त बैठकांचे सत्र आणि जुन्या वैरांना पुन्हा उजाळा मिळताना दिसत आहे.

या गटातील प्रत्येक हालचाल आता संपूर्ण तालुक्याच्या चर्चेचा विषय ठरत आहे.या गटात प्रमुख राजकीय पक्षांचे वजनदार पदाधिकारी आणि माजी लोकप्रतिनिधी सक्रिय असल्याने चुरस वाढली आहे. ग्रामपंचायत, सोसायटी आणि बाजार समितीच्या निवडणुकांमध्ये दिसणारी गटातटाची खेचाखेची आता थेट जिल्हा परिषद निवडणुकीत परावर्तित होत आहे.

आपला माणूस पुढे नेण्याच्या स्पर्धेत स्थानिक नेते एकमेकांसमोर उभे ठाकल्याचे चित्र असून, याचा परिणाम पक्षीय संघटनात्मक ताकदीवर होताना दिसत आहे.जानेवारी अखेरपर्यंत निवडणूक घेणे प्रशासनासाठी गरजेचे आहे, अन्यथा दहावी-बारावीच्या परीक्षांमुळे कार्यक्रम पुढे ढलावा लागेल. निवडणूक लांबणीवर पडल्यास इच्छुकांचे आर्थिक गणित बिघडेल, कार्यकर्त्यांचे मनोबल ढासळेल अशा अनेक कारणास्तव अनेक जण वेळेवर निवडणुका व्हाव्यात यासाठी आतूर आहेत.

शिरूर तालुक्यातील राजकारणाचा कणा मानल्या जाणाऱ्या तळेगाव ढमढेरे जिल्हा परिषद गटात सध्या राजकीय हालचालींना उधाण आले असून निवडणुकीपूर्वीच मोठ्या राजकीय भूकंपाची चाहूल लागली आहे. सध्या प्रत्येक पक्षात इच्छुकांची संख्या मोठी असून त्यांनी जनसंपर्क सुरू केला आहे. मात्र, अधिकृत उमेदवारीची खात्री नसल्याने अनेकांमध्ये अस्वस्थता आहे. तिकीट नाकारले गेल्यास अपक्ष म्हणून निवडणूक रिंगणात उतरण्याची कुजबुज सुरू झाल्याने राजकीय पक्षांसमोरील डोकेदुखी वाढली आहे.




### मागील निवडणुकीची जखम अजून ताजी

» मागील पंचवार्षिक निवडणुकीत जिल्हा परिषद व दोन्ही पंचायत समिती सदस्य अपक्ष निवडून येणे, ही घटना आजही राजकीय पक्षांसाठी चिंतेची बाब आहे. उमेदवारीवरून झालेली गटबाजी आणि समन्वयाच्या अभावामुळे पक्षांची ताकद कोलमडली होती. हीच पुनरावृत्ती टाळण्यासाठी यंदा वरिष्ठांकडून प्रयत्न सुरू असले, तरी स्थानिक पातळीवरील असंतोष अजूनही कायम आहे.